# वृद्धाश्रम

भारता मध्येच काय परंतु, सर्व जगात वृद्धांची संख्या वाढत आहे. आधुनिक आरोग्य प्रबंधा मुळे सरासरी वयात गेल्या कांही वर्षात चांगलीच वाढ झाली आहे. आणि ही वाढ होतच राहणार आहे. परंतु त्याच बरोबर एक चांगली गोष्टही झाली आहे. शाररीक क्षमताही वाढली आहे. सत्तरीचे वृद्ध पूर्वीच्या त्याच वयाच्या वृद्धा पेक्षा जास्त कार्य प्रवण आहेत. केंद्र शासनानेही निवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे केले आहे. वरील मुद्दा सिद्ध करण्याला हे पुरेसे आहे. कारणे कांहीही असू द्या. हल्ली असलेले तथा कथित वृद्ध कांही ना कांही काम करू शकतात. त्यांची कार्य क्षमता तरुणा एवढी नक्कीच नसेल परंतु, निरुपयोगी नक्कीच नाही. कांहीना मुले नसतील आणि असली तरी मुलांच्या व्यावसायिक कारणा मुळे त्याना मुलांच्या कडे राहता येणे शक्य नसेल, कांही मुलाना व्यवसाया मुळे दर कांही वर्षानी गांव बदलावे लागत असेल. त्या मुळे वृद्धाश्रमांची गरज असू शकते. तेंव्हा त्यांचे करता वृद्धाश्रम जरूर असावेत. परंतु, वृद्धाश्रमाचे स्वरूप फक्त राहण्याचे, जेवणा खाण्याचे, कसा तरी वेळ घालवण्याचे ठिकाण असे नसावे.

वृद्धाना जेष्ठ नागरिक म्हणू लागले आहेत. जेष्ठ नागरिक सांपत्तिक दृष्ट्या सर्वच थरात आहेत. व्यावसायिक दृष्ट्या जवळ जवळ सर्वच कोठल्या तरी सेवेतून निवृत्त झालेले आहेत. स्वतःच्या व्यवसायातून सहसा कोणी निवृत्त होत नाही. झालाच तर शाररीक क्षमता खूपच कमी झाल्यावरच. परंतु, हे जेष्ठ नागरिक सुद्धा कांहीना कांही योगदान जरूर देऊ शकतात. कोठल्या तरी सेवेतून निवृत्त झालेले जेष्ठ नागरिक ५-१०-१५ अगदी २०-२५ वर्षे सुद्धा कार्यरत राहू शकतात. म्हणजे रोज ६-८ तास काम करू शकणार नाहीत, फारसा प्रवास करी शकणार नाहीत, कमी अंग मेहनत करू शकतील. परंतु, कांहीना कांही काम करू शकतील. अनुभव हा त्यांचा मोठा आधार असेल. शाररीक क्षमतेची कमतरता अनुभवाच्या आधारे पूर्ण करू शकतील. जे काय करतील त्याचेही मूल्य टाकाऊ असणार नाही.

प्रौढ शिक्षण, शाळकरी मुले सांभाळणे, घरपोंच येणाऱ्या वस्तू घेऊन ठेवणे, छोट्या मोठ्या दुरुस्ती करणे, सल्ला देणे, कागद पत्रे तयार करणे वगैरे प्रकारची अनेक कामे ही मंडळी करू शकतात. प्रौढ शिक्षणाला तसेंच शाळकरी मुले सांभाळण्यास तर यांचे शिवाय दुसरा स्वस्त पर्याय सापडणारच नाही. पती-पत्नी दोघेही व्यवसाय करत असतील तर स्वयंपाकाचे गॅस सिलिंडर कोण घेऊन ठेवणार? शासनाच्या कार्यालयातून निवृत्त झालेल्या पेक्षा त्या कार्यालयातील कामा बद्दल कोण जास्त चांगला सल्ला देऊ शकेल? निरनिराळ्या सेवेतून निवृत्त झालेले जेष्ठ नागरिक त्या त्या सेवे बद्दल नक्कीच अधिकार वाणीने सांगू शकतील.

या करता जेष्ठ नागरिकांची व्यवस्था इतरा पासून दूर करून चालणार नाही. त्याना इतरा मध्येच सामाऊन घेतले पाहिजे. नगररचनाकारानी त्या करता गृह निर्माण नियमा मध्ये तरतूद केली पाहिजे. खेड्या मध्ये तसेंच छोट्या शहरांत गल्ली गल्ली मध्ये १०-१२ जेष्ठ नागरिकाना राहण्या करता घरे बांधता येतील या आकाराचे भूखंड आरक्षित करावेत. जेष्ठ नागरिकांना सोईस्कर अशा घरांचे नकाशे बनवावेत. बांधकाम व्यवसायिकानी या भूखंडावर अपेक्षित घरे बांधावीत व जेष्ठ नागरिकाना भाड्याने द्यावीत. अशी घरे जेष्ठ नागरिक परलोकवासी झाल्यावरच रिकामी होतील व तद् नंतर फक्त जेष्ठ नागरिकालाच देता येतील. त्या परिसरातील डॉक्टरानी जेष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. निरनिराळ्या सेवा संस्थानी त्याना तत्पर सेवा द्यावी. शासनाने या करता नियम बनवावेत. जसे ग्रामपंचायत, नगरपालिका, बाधकाम व्यवसायिक, डॉक्टर, सेवा संस्था वगैरेंची कर्तव्ये काय असावीत व ती कशा प्रकारे पूर्ण करावीत. उदाहरणार्थ, डॉक्टरांच्या निरनिराळ्या फी, डॉक्टरानी जेष्ठ नागरिकाला देण्याच्या सलग्न दोन भेटीतील कालावधी, नियमीत करावयाच्या चाचण्या (रक्त दाब, वजन, जीभ, डोळे वगैरे), बांधकाम व्यवसायिकाला द्यावयाचे मासिक भाडे, दूरध्वनीचे मासिक भाडे, प्रत्येक सेवा देणाऱ्याने ठेवावयाची नोंद वगैरे. मोठ्या शहरात उंच इमारतीत पहिल्या मजल्यावर अशा प्रकारचे आरक्षण ठेवता येईल.

या बदल्यात जेष्ठ नागरिकाने स्वतःच्या जंगम इस्टेटीचा वारसदार म्हणून शासनाचे नांव लावावे.

*****